महाराष्ट्र शासन

क्रमांक :-माशास्थ ३३१६/प्र.क्र.२६९/एसएम-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २९ सप्टेंबर, २०१७

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,
१७ डॉ.आंबेडकर रोड, कॅम्प रोड,
पुणे - ४११ ००१.

विषय :- सुसंपन्न ज्ञानप्रसारक मंडळ, पुणे संचलित कानसे, ता.आंबेगाव, जि.पुणे येथील माध्यमिक शाळेचे आढले खुर्द, ता.मावळ, जि.पुणे येथे केलेल्या स्थलांतरास मान्यतेबाबत.

संदर्भ : आपले क्र.शिउस/पुवि/माध्य-३/१३/स्थलांतर/२३१९२/९५/२०११-१२, दिनांक २० सटेंबर, २०१२ चे पत्र.

सुसंपन्न ज्ञानप्रसारक मंडळ, पुणे संचलित कानसे, ता.आंबेगाव, जि.पुणे येथील माध्यमिक शाळेचे, आढले खुर्द, ता.मावळ, जि.पुणे येथे केलेल्या स्थलांतरास मान्यता देण्याचा प्रस्ताव संदर्भाधीन पत्रान्वये शासनास सादर झाला आहे.

२. सुसंपन्न ज्ञानप्रसारक मंडळ, पुणे या संस्थेस, कानसे, ता.आंबेगाव, जि.पुणे येथे इयत्ता ८ वी- मराठी माध्यम, कायम विनाअनुदानित तत्वावर सन १९९९-२००० पासून सुरू करण्यास शासनाने क्र.नमाशा/१०९९/(६८२/९९)/ माशि-१, दिनांक ९/०७/१९९९ अन्वये परवानगी दिली. तथापि ग्रामस्थांच्या त्रासामुळे संस्थेस त्या ठिकाणी शाळा सुरू ठेवता आली नाही. संस्थेने शासनाची मान्यता न घेता सन २००३-०४ पासून आढले खुर्द, ता.मावळ, जि.पुणे येथे माध्यमिक शाळा सुरू केली. या शाळेच्या स्थलांतरास मान्यता देण्याची विनंती संस्थेने केली आहे. तसेच याबाबत मा.उच्च न्यायालयात रिट यचिका दाखल केली होती.

मौजे आढले खुर्द, ता.मावळ, जि.पुणे येथे शाळा सुरू करण्याबाबत संस्थेने केलेला खुलासा विचारात घेऊन सदर माध्यमिक शाळेच्या स्थलांतरास खाली नमूद अटी व शर्तीवर शासनाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे :-

१) सदर शाळेची मान्यता शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांनी काढलेली नसल्याची तसेच याबाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नसल्याची खात्री करण्यात यावी.

२) सदर शाळेमध्ये विहित निकषानुसार किमान पटसंख्या असणे आवश्यक राहील.

३) स्थलांतरापूर्वीच्या सर्व विद्यार्थ्यांचे जवळच्या शाळेत/ स्थलांतराच्या ठिकाणी समायोजन केले आहे व याबाबत कोणतीही तक्रार/ आक्षेप नाही याची खात्री करण्यात यावी.

४) स्थलांरापूर्वी शाळेत कार्यरत असलेल्या अर्हता प्राप्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना स्थलांतरित ठिकाणी सामावून घेण्यात आले आहे व त्यांच्या सेवाशर्तीमध्ये बदल करण्यात येणार नाही, तसेच स्थलांतराच्या ठिकाणी शिक्षक/ शिक्षकेतर पदे विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून भरण्यात आली आहेत. याबाबत संस्थेचे अध्यक्ष/ सचिवांचे रू.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.

मुख्याध्यापक
समाजभूषण मोतीलाल शर्मा विद्यालय
आढले खुर्द, ता: मावळ, जि.पुणे-४१०५०६

५) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार व शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशानुसार, शाळेसाठी पक्की इमारत व सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, याबाबत संस्थेचे अध्यक्ष/ सचिवांचे रू.१००/- च्या स्टँम्पपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र घेण्यात यावे.

६) स्थलांतरीत शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाही.

७) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दिनांक २८/०८/२०१५ नुसार विहित केलेल्या संच मान्यतेच्या सुधारित निकषानुसार व याबाबत शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशांनुसार अनुज्ञेय होणाऱ्या पदांइतके शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी प्राथमिक शाळेत कार्यरत राहतील व त्यापेक्षा जास्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत राहणार नाहीत हे संस्थेस बंधनकारक राहील. तसेच अनुज्ञेय पदांपैकी रिक्त पदे अतिरिक्त कर्मचाऱ्यांमधून समायोजनाने भरण्याबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

८) शाळा, शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/ वेतनेतर अनुदान, विद्यार्थी इ. बाबत शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, शासन निर्णय, आदेश इ. चे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील. याअनुषंगाने शाळेबाबत युडायस क्रमांक, सरलची माहिती, संच मान्यता व विद्यार्थी आधारकार्ड नोंदणी याची पूर्तता करणे आवश्यक राहील.

९) सदर शाळा मुळ ठिकाणी अनुदानाच्या ज्या तत्वावर आहे, त्याच तत्वावर स्थलांतरीत ठिकाणी मंजूरी राहील.

१०) सदरहू स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप आल्यास किंवा स्थलांतरासंदर्भातील अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास स्थलांतर रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

११) भविष्यात शासन मान्यतेशिवाय शाळेचे स्थलांतरण करण्यात येणार नाही, याची संस्थेने नोंद व दक्षता घेणे आवश्यक राहील.

३. वरील अट क्र.(४) व (५) ची पूर्तता झाल्यावर, विभागीय शिक्षण उपसंचालक, पूणे विभाग, पुणे यांनी सदरहू शाळेच्या स्थलांतरास मान्यता देण्याबाबत आवश्यक पुढील कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास कळविण्यात यावे.

(प्रविण मुंढे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

मुख्याध्यापक
समाजभूषण मोतीलाल शर्मा विद्यालय
आढले खुर्द, ता. मावळ, जि. पुणे-४१०५०६

मुख्याध्यापक
माध्यमिक विद्यालय आढले खुर्द
ता. मावळ, जि. पुणे पिन-४१०५०

प्रत :-
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
श्री.गहिनाथ ढाकणे,
अध्यक्ष, सुसंपन्न ज्ञानप्रसारक मंडळ,
२५, नारायण पेठ, पुणे- ४११०३०.
...नी (एसएम-१)